**मे. येडेश्वरी ॲग्रो प्रोडक्टस लिमिटेड, गट नं. ११९, १२०, आनंदगाव (सारणी), पो. जवळबान, ता. केज, जि. बीड, महाराष्ट्र या उद्योगांच्या प्रस्तावित विस्तार यांच्या कार्यरत मळीवर आधारित ४५.० किलो लिटर प्रतिदिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्पाचे मळीवर/केन ज्युस वापरुन १०५.० किलो लिटर प्रति दिन क्षमतेपर्यंत विस्तारिकरण करणेबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचा इतिवृत्तांत:**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स येडेश्वरी एग्रो प्रोडक्टस् लिमिटेड, गट नं. ११९, १२०, आनंदगाव (सारणी), पोस्ट-जवळबन, तालुका- केज, जिल्हा- बीड, महाराष्ट्र यांच्या कार्यरत मळीवर आधारित ४५.० किलो लिटर प्रतिदिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्पाचे मळीवर/केन ज्युस वापरुन १०५.० किलो लिटर प्रति दिन क्षमतेपर्यंत विस्तारिकरण करणेबाबतची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी गुरुवार, दिनांक, ११ फेब्रुवारी, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थळावर आयोजित करण्यात आली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ११ /२०२१ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२१०२०५-एफटीएस-०००२, दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आली:-

१. **श्री. रविंद्र जगताप**
जिल्हाधिकारी, बीड
जिल्हा बीड. : अध्यक्ष

२. **श्री. प्रविण जोशी**
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद : सदस्य

३. **डॉ. योगिनी बाळंखे**
उ प-प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, जालना : समन्वयक

डॉ. योगिनी बाळंखे, प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, जालना तथा आयोजिका, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना कोविडच्या

पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

डॉ. योगिनी बाळंखे आयोजिका पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री रविंद्र जगताप, भाप्रसे, जिल्हाधिकारी, बीड तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, डॉ. पी. एम. जोशी, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

डॉ. योगिनी बाळंखे यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

डॉ. योगिनी बाळंखे आयोजिका यांनी असे सांगितले की, प्रकल्प प्रवर्तक मेसर्स येडेश्वरी अॅग्रो प्रोडक्टस् लिमिटेड, गट नं. ११९, १२०, आनंदगाव (सारणी), पोस्टजवळबन, तालुका केज, जिल्हा बीड, महाराष्ट्र यांच्या कार्यरत मळीवर आधारित ४५.० किलो लिटर प्रतिदिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्पाचे मळीवर/केन ज्युस वापरुन १०५.० किलो लिटर प्रति दिन क्षमतेपर्यंत विस्तारिकरण करणेबाबतची प्रकल्प उभारणीसाठी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग अ ५ (जी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

डॉ. योगिनी बाळंखे यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांना प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार

करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ११-०२-२०२० रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक २०-०२-२०२० रोजी प्रदान केली.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २०२० च्या कार्यालयीन टिप्पणीनुसार कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार उपस्थितांनी बैठकीत मुखपट्टी, दोन व्यक्तींमध्ये अंतर पाळण, सॅनिटायझरचा वापर बंधनकारक करण्यात आलेला आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय , म.प्र.नि. मंडळ, जालना यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र सकाळ व राष्ट्रीय वृत्तपत्र द टाइम्स ऑफ इंडिया यात मराठी तसेच इंग्रजी भाषेमध्ये दिनांक ०९ जानेवारी, २०२१ रोजी जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर-४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-बीड, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय - बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, बीड, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, बीड , तहसील कार्यालय-केज, जिल्हा बीड, ग्रामपंचायत कार्यालय- सारणी (आनंदगाव), युसूफ वडगाव, बावची, पाथरा, पैठण, भाटुंबा, चंदनसावरगाव, जवळबान, सावळेश्वर, आनेगाव, गोटेगाव, शेलगाव गंजी, बोबडेवाडी, कुंभेफळ, ढाकेफळ, तालुका-केज, जिल्हा बीड, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ -औरंगाबाद, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जालना, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

डॉ. योगिनी बाळंखे आयोजिका यांनी सांगितले की, वरिल प्रस्तावित प्रकल्पाबाबत उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, जालना यांना श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, अध्यक्ष, धरित्री पर्यावरण परिरक्षणा संस्था, जिल्हा-नालगोंडा, तेलंगणा राज्य, श्री एच. मधुबाबू, अध्यक्ष, रुरल एन्हॉयरमेंट एज्युकेशन एन्ड हेल्थ अवरनेस सोसायटी, मुशीराबाद, हैद्राबाद तसेच श्री रंगाराव कोथकोन्डा. पर्यावरणवादी,मदर अर्थ पोल्युशन कंट्रोल सोसायटी, सरुर नगर, रंगारेड्डी, तेलंगणा राज्य, यांच्या सूचना प्राप्त झालेल्या आहेत. तसेच पूढे डॉ. योगिनी बाळंखे यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना विनंती केली की,त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना, प्रश्न असल्यास त्यांना

या ठिकाणी संधि देण्यात येईल त्यांनी त्यांचे प्रश्न या ठिकाणी लेखी वा तोंडी स्वरुपात व्यक्त करू शकता.

डॉ. योगिनी बाळंखे यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयीचा संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत सखोल माहिती दिली.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आले:-

**जाहीर लोकसुनावणी दरम्यान सार्वजनिक सहभागींनी सदर प्रकल्पासंबंधित काही प्रश्न, सुचना, आक्षेप उपस्थित केले ते खालील प्रमाणे आहेत.**

१) **श्री नारायण प्रल्हाद शिंदे, राहणार-होळ, तालुका-केज, जिल्हा-बीड:-**

मी ऊस उत्पादक शेतकरी आहे. या कारखान्यामुळे आमचे जीवनमान उंचावण्यासाठी फारच फायदा झालेला आहे. हा आमचा विशेष मागास व इतर तालुक्यांना कामगार पुरविणारा तालुका. या कारखान्यामुळे रोजगाराची संधि मिळाली व आमच्या जीवनास नवसंजीवनी देण्यात या कारखान्याचा भार मोठा वाटा आहे. या प्रकल्प विस्तारिकरणामुळे स्थानिक शेतक-यांच्या ऊसाला जास्त भाव देता येईल. येथील स्थानिक काम नसल्याने बाहेरगावी जातात, त्यांनाही प्रकल्प विस्तारिकरणामुळे रोजगाराची संधि मिळेल. सोलापूर, उस्मानाबाद व नांदेड या जिल्ह्यात आमची ऊसउत्पादकांची पिळवणूक होत होती. मात्र सदरहू प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर आमची ऊसाबाबतची पिळवणूक थांबलेली आहे. तरी सदरहू प्रकल्पास विस्तारिकरणासाठी सहकार्य करावे.

२) **श्री सुहास गणपत गुजर, सरपंच, धनेगांव ग्रामपंचायत, तालुका- केज, जिल्हा-बीड:-**

माझ्या गावाशेजारी मांजरा धरण आहे. ४० वर्षांपूर्वी त्याच्यात पाणी साठवणुक चालू झालेली आहे. त्यामुळे आमचा भाग हा ग्रीन बेल्ट समजला जातो. कारण तेथे सर्वात जास्त ऊसउत्पादक शेतकरी आहेत. त्यामुळे आमचे व कारखान्याचे अतिशय जवळचे संबंध आहेत. २००९-२०११ सालची गोष्ट आहे. जेवढे कष्ट ऊस उत्पादन घेण्यास लागत, तेवढेच कष्ट ऊस घालविण्यासाठी लागत. आम्हांला लांब असलेल्या पुण्याजवळील संत तुकाराम व लातूर येथील बुक्केश्वर साखर कारखान्यात ऊस द्यावा लागे. त्यावेळी आमची भरपूर पिळवणूक झाली. बुक्केशवर कारखान्याने स्वत:च्या सभासदांना ९०० रुपये भाव दिला, तर आम्हांला दुय्यम समजून फक्त ५०० रुपये भाव दिला. तर पुण्याच्या संत तुकाराम कारखान्याने फक्त ३०० रुपये भाव देईन आम्हांला वाटेला लावले. ही परिस्थिती होती कारण आमच्या परिसरात कारखाना नव्हता. त्यामुळे शेतक-

याला बांधावर ऊस टाकावा लागे किंवा आहे तो भावात विकणे भाग पडे. २०१३ साली या कारखान्याचा उदय झाला, तेव्हाच येथील शेतक-यांचाही उदय झाला असे आम्ही समजतो. स्थानिक शेतक-याना विश्वास आला की आमचा ऊस बांधावर टाकावा लागणार नाही. त्यामुळे येथील शेतकरी ऊसउत्पादक राहिला, नाहीतर तो राहिला नसता. हा कारखाना सुरु झाल्यापासून आम्हांला भावपण दिला व आम्हांला वागणूकही चांगली मिळाली. तर आता आसवणी विस्तारिकरणामुळे आमच्या ऊसाला चांगला भाव मिळेल. तरी सदरहू प्रकल्पास मान्यता द्यावी अशी कळकळीची विनंती करण्यात येत आहे.

यावेळी डॉ. योगिनी बाळंखे आयोजिका पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचना केली की प्रथम उपस्थितांना प्रश्न विचारु द्यावेत, नंतर त्याचे उत्तर हे एकत्रित देण्यात यावे.

३) **श्री धोंडिराम विठ्ठल सोनवणे, राहणार- सारणी (आनंदगाव), तालुका-केज, जिल्हा-बीडः-**
आसवणी विस्तारिकरण प्रकल्पात प्रदूषण नियंत्रणासाठी प्रकल्प प्रवर्तकांनी झाडे लावण्याची योजना केलेली आहे काय?

४) **श्री किशोर व्यंकटराव पवार, सरपंच, कुंभेफळ, तालुका-केज, जिल्हा-बीडः-**
या भागातील परिस्थिती अशी आहे की दर ३-४ वर्षांनी येथे दुष्काळ पडतो. पाऊस झाल्यावरच ऊस लावण्यात येत होता. ऊसाशिवाय दुसरे पीक आमच्या भागात शेतक-यांकडे होत नाही. सात वर्षांपूर्वी अशी परिस्थिती होती की २- २ १/२ वर्षे आमच्या शेतातील ऊस जात नव्हता. मात्र या कारखान्याने येथील शेतक-यांचा आर्थिक स्तर ऊसामुळे या कारखान्याने उंचावला. या कारखान्यामुळेच येथील शेतकरी व बेरोजगार उभा आहे. एवढेच मला सांगायचे आहे.

५) **श्री संभाजी मोहन लोमटे, राहणार- मु.पो.- होळ, तालुका- केज , जिल्हा-बीडः-**
या येडेश्वरी कारखान्याची स्थापना २०१३ ला झाली. त्यावेळी बीड जिल्ह्यातील एकही कारखाना चालू नव्हता. त्यावेळी या कारखान्याच्या चेअरमनसाहेबांनी, ज्यांना शेतक-याची जाण आहे, त्यांना आदेश काढला की कारखान्याचे नुकसान झाले तरी चालेल, पण शेतक-याचा ऊस वाया जाता कामा नये. २०१३ ला या कारखान्याने ३,१८,००० मे.टन गाळप केले. नाहीतर त्यावेळी किती आत्महत्या झाल्या असत्या. या कारखान्यामुळे या भागाला संजिवनी मिळाली की शेतक-याचा पूर्ण ऊस त्याच्या शेतात पडून न राहता कारखान्यात येतो. तरी या कारखान्याच्या सर्व पदाधिकारी व कर्मचारी यांचे धन्यवाद.

६) **श्री राजेन्द्र निवृत्ती ठोंबरे, राहणार-मु.पो. दहिफळ, तालुका- केज जिल्हा-बीडः-**
ह्या कारखान्यातून पर्यावरणाला हानीकारक असे काही अपाय होईल काय? त्याची विल्हेवाट कशी लावण्यात येईल?

७) **श्री वैजनाथ नानासाहेब चौधरी, राहणार-पैठण (सा) तालुका-केज, जिल्हा- बीडः-**
आसवणी विस्तारिकरणामुळे प्रदूषण होईल, तर प्रदूषण रोखण्यासाठी नविन झाडे लावणार काय?

८) **श्री शिवाजी भाऊसाहेब गाडगे, ढाकेफळ, तालुका- केज, जिल्हा-बीड:-**
कारखाना सुरु झाल्यापासून येथील स्थानिकांना रोजगार मिळाला. कारखान्यापासून काहीही नुकसान नाही.

९) **श्री किरण कर्नाटक सोनावणे, सारणी,तालुका-केज, जिल्हा-बीड:-**
प्रकल्पासाठी कच्च्या मालाचा पुरवठा कसा केला जाईल?

१०)**श्री मधुकर धोंडीराम साखरे, राहणार- कानडी बदन, तालुका-केज, जिल्हा-बीड:-**

**११) श्री उत्तम रामहारी लोमटे राहणार – ताडगांव, तालुका-कळंब, जिल्हा-उस्मानाबाद:-**
या प्रकल्पापासून स्थानिक लोकांना काय फायदा/परिणाम होईल काय?

१२) **श्री गोविंदप्रसाद चौधरी, राहणार-पैठण, तालुका-केज, जिल्हा-बीड-**
आसवणी प्रकल्पापासून कोणते उप-पदार्थ तयार करता येतील?

१३) **श्री धनजंय विठ्ठल करपे,मु.पो.जवळबन, तालुका-केज, जिल्हा-बीड-**
अल्कोहोल निर्मितीसाठी कोणती पध्दत वापरली जाणार आहे?

१४) **श्री अरुण अप्पाराव गायकवाड, राहणार-सारणी, तालुका-केज, जिल्हा-बीड:-**
अल्कोहोल निर्मितीसाठी कोणती पध्दत वापरली जाणार आहे?

डॉ. योगिनी बाळंखे, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी आतापर्यंत उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देण्याची सूचना केली.

अ) प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर देताना सांगितले की दोघांनी हरित पट्टा विकास/झाडे लावण्याबाबत विचारणा केलेली आहे. त्यांनी सांगितले की आपल्याला ३३% हरित पट्टा विकसित करणे बंधनकारक आहे. आता झाडे कोणत्या प्रकारची लावावी हा मुद्दा उपस्थित करण्यात आलेला होता. त्यासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने २००८ साली काही मानके प्रकाशित केलेली आहेत, त्या प्रकारची झाडे लावण्यात येतील, म्हणजे मोठी पाने असलेली झाडे वा डेरेदार वृक्ष लावावीत, जेणेकरुन प्रदूषकांना अटकाव करण्यात येईल. या प्रकारच्या झाडांचे आम्ही नियोजन करणार आहोत.

ब) दुसरा प्रश्न विचारण्यात आला होता की प्रकल्पात कुठले घन टाकाऊ पदार्थांची निर्मिती होईल? त्यास उत्तर देताना सांगितले की प्रकल्प उत्पादनात यीस्ट सल्ज ह्या टाकाऊ घनपदार्थाची निर्मिती होते. त्यातील पाणी काढून तो इन्सिनरेशनमध्ये जाळाला जातो. त्याचप्रमाणे सीपीयु स्लजमधील पाणी काढून ते इन्सिनरेशन बॉयलरमध्ये जाळण्यात येतात.

क) कारखान्यास लागणा-या कच्चा मालाचा स्त्रोत विचारण्यात आला. तर जे मोलॅसिस कच्चा माल म्हणून लागेल, ते साखर कारखान्यातून व गरज पडल्यास टेंडर काढून विकत घेता येऊ शकते. त्याचा काहीही तुटवडा पडणार नाही. त्याशिवाय गरज पडल्यास साखर विभागातील केन ज्युसचा वापर करण्यात येईल व उरलेले केन ज्युस आपण साखर उत्पादनासाठी वापरू.

ड) प्रकल्पापासून फायदा काय याबाबत विचारणा करण्यात आली. तर प्रकल्प प्रवर्तकांनी सीएसआर (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटी निधी) साठी दीड कोटी रुपये राखीव ठेवण्यात आलेले आहेत. त्यात उत्तम प्रकारचा पाणीपुरवठा, शौचालय, हरितपट्टा, ठिबकसिंचन योजना राबविण्यात येतील.

इ) सदरहू प्रकल्पाचा लोकांच्या आरोग्यावर काही परिणाम होईल काय हा प्रश्न होता. तर हवेची गुणवत्ता ही मानकांप्रमाणे पाळण्यात येतील. तसेच सदरहू प्रकल्पात कोणत्याही प्रकारचे घातक उत्पादन घेण्यात येणार नाही. आसवणी प्रकल्प हा २०१७ पासून चालू आहे. आम्ही १० कि.मी. परिघातील लोकांच्या आरोग्याचा अभ्यास केलेला आहे.

ई) आसवणी प्रकल्पातील उत्पादन पध्दत विचारली. फार छान प्रश्न विचारण्यात आलेला आहे. तर आसवणी प्रकल्पात पूर्वी बॅच फरमेन्टेशन पध्दत होती, आता सतत फरमेन्टेशन (Continuous Fermentation) ही पध्दत आसवणी प्रकल्पात कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यामुळे सांडपाणी कमी प्रमाणात निर्माण होते व उत्पादकाची गुणवत्ता चांगली राहते. सतत फरमेन्टेशन (Continuous Fermentation) ही पध्दत आर्थिकदृष्ट्या फायद्याची आहे.

उ) स्पेंट वॉशबाबत प्रश्न विचारण्यात आलेला होता. तर स्पेंट वॉश हा जाळून नष्ट करण्यात येईल व त्याची राख ही कंपोस्टींग यार्डा मध्ये सहायक कच्चा माल म्हणून वापरण्यात येईल.

ऊ) एक प्रश्न बाय-प्रोडक्टच्या बाबतीत विचारण्यात आलेला आहे. तर जो कार्बन-डाय-ऑक्साईड निर्माण होतो, तो बॉटलींग करता येईल व करोनाची लस देताना कोल शिल्ड म्हणूनही वापरता येईल. तरी हा कार्बन-डाय-ऑक्साईड बॉटलींग प्रकल्प त्वरित हाती घेण्यात येईल.

वरिल प्रश्नांची उत्तरे पर्यावरण सल्लागार यांनी दिल्यानंतर आयोजिका यांनी उपस्थितांना त्यांचे काही प्रश्न असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

१५) **श्री उमाकांत सिध्दलिंग भुसारी, पंचायत समिती सदस्य,मु,पो, -युसुफवडगाव, तालुका - केज, जिल्हा -बीड**

सदरहू प्रकल्प कार्यान्वित झाल्यामुळे आमच्या भागातील जो स्थलांतरित मजूर दुस-या राज्यात जात होता, तो स्थलांतरित होण्याचा लोंढा थांबला.

दुसरा विषय म्हणजे मी ज्या भागात काम करतो, तेथे जवळजवळ ३०,००० हेक्टर एवढी ऊसाची लागवड झालेली आहे. या कारखान्याने गेले सात वर्षे एफ.आय.आर.प्रमाणे भाव दिले व कधिही पैसे प्रलंबित ठेवलेले नाहित. तरी हा प्रकल्प जेवढा मोठा होईल, तेवढा या भागातील आर्थिक स्थर उंचावण्यास मदत होईल. तरी प्रकल्प मंजूरीसाठी त्वरित पुढील कार्यवाही करण्यात यावी.

१६) **श्री म्हस्के उद्दव राजाभाऊ, राहणार-सावळेश्वर, तालुका -केज, जिल्हा- बीडः-**

माझे दोन प्रश्न आहेत. पहिला प्रश्न ६० केएलपीडी आसवणी प्रकल्पात ६ लाख लिटर्स एवढा स्पेंट वॉश तयार होईल. त्याची विल्हेवाट कशी लावणार?

दुसरा प्रश्न या प्रकल्पामुळे आमच्या भागात रोजगार निर्मिती होईल काय?

**श्री गणेश कचरु नांदे, राहणार – मु पोस्ट – बावची, तालुका – केज,जिल्हा-बीडः-**

या माळरानावर येडेश्वरी कारखाना चालू झाला. आमचे छोटे गाव आहे. ४००-५०० लोकांचे गाव आहे. या गावातील १०-१२ युवक या कारखान्यात आहे. तरी या प्रकल्पामुळे त्यांचा उदरनिर्वाहास साधन मिळाले. आमच्या गावातील लोकांनी ऊसाचे पीक घेतले व संपूर्ण जिल्ह्यात हा कारखाना सर्वात जास्त भाव देत आहे. तरी मी हा कारखाना मोठा व्हावा ही अपेक्षा करत असून यास कारखान्यास सहकार्य करावे ही विनंती.

१८) **श्री राऊत अमोल रतन, राहणार-आनंदगाव (सारणी), तालुका-केज, जिल्हा-बीडः-**

हा आसवणी प्रकल्प वर्षात किती महिने कार्यान्वित राहणार आहे?

१९) **श्री थोरात भाऊसाहेब शंकर, राहणार-कुंभेफळ, तालुका-केज, जिल्हा-बीडः-**

प्रकल्पात कोणती उप-उत्पादने तयार होतील?

२०) **श्री दत्तात्रय व्यंकटराव भाकरे, राहणार-जवळगड, तालुका- केज जिल्हा-बीडः-**

सदरहू विस्तारिकरण प्रकल्पामुळे या भागातील लोकांना कोणता फायदा होईल?

२१) **श्री एच. मधुबाबू,अध्यक्ष, रुरल एन्हॉयरमेंट एज्युकेशन एन्ड हेल्थ अवरनेस सोसायटी,मुशीराबाद, हैद्राबादः-**

मी लेखी स्वरुपात सूचना पाठविलेल्या आहेत. प्रकल्प विस्तारिकरणामुळे परिसराचा विकास होईल. स्थानिकांना नोक-या मिळतील. प्रकल्पास पाठिंबा.

२२) **श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, अध्यक्ष, धरित्री पर्यावरण परिरक्षणा संस्था, जिल्हा-नालगोंडा, तेलंगणा राज्यः-**

श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी यांनी हिंदी व मराठीत सांगितले की ते भारतातील सर्वात प्रथम असे पर्यावरणवादी आहेत की जो औद्योगिक विकासाचा आग्रह करत असतो. पर्यावरणवादी हे उद्योगांना विरोध करतात. पण मी नेहमी उद्योगविकासाचे समर्थन करतो. त्यांनी आसवणी विस्तारिकरणाबद्दल प्रकल्प प्रवर्तकांचे अभिनंदन केले. भारतात बेकारी हेच मोठे प्रदूषण आहे. भारतात ४० कोटी युवक युवती जे १८-३५ वर्षातील आहेत, ते नोकरीच्या प्रतिक्षेत आहेत. महाराष्ट्रातील उद्योगविकासाची परिस्थिती चांगली आहे. मी पर्यावरण संरक्षण, संवर्धन व उद्योग विकासासाठी काही सुझाव देत आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघाचे पाणी,हवा, जमिन यांचे आधारभूत सर्वेषण केलेले आहे. ते चांगले केलेले आहे. माझी विनंती आहे की कृपया प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघातील जनतेची आरोग्याची सद्यस्थिती, पीक उत्पादनाची सद्यस्थिती व भूगर्भातील पाण्याची सद्यस्थिती याचा अहवाल तयार करण्याची सूचना केली. पर्यावरण समतोल अभ्यासासाठी त्याचा उपयोग होईल.

आपल्या प्रकल्पात १२ एकर जमिन आहे. येथे पावसाचे पाणी साठवणूक (रेन वॉटर हार्वेस्टींग) अंमलात आणावे. पावसाचे पाणी साठवण्यासाठी मोठी साठवण टाकी बांधण्याची मागणी केली व पावसाळा संपल्यानंतर त्या साठवण टाकीतीलच पाणी वापरण्याची सूचना केली. पाणी हे मर्यादित स्त्रोत असते.

कृपया प्रकल्पात हरितपट्टा विकसित करताना फळझाडे व औषधी वनस्पती मोठ्या प्रमाणात लावण्यात यावीत. त्याचप्रमाणे जवळील गावात हरितपट्टा विकसनाचा कार्यक्रम राबविण्यात यावा. त्याचप्रमाणे रस्त्याच्या दोन्ही बाजूस हरितपट्टा विकसित (Avenue Plantation) करण्यात यावा. त्याचा उपयोग हा प्रदूषण नियंत्रणासाठी व ग्रामस्थांना फळे मिळण्यासाठी होईल.

कृपया स्थानिक युवक युवतींसाठी कौशल्यविकास कार्यक्रम राबविण्यात यावा. प्रकल्पात स्थानिक युवक युवतींना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे.

ऊसपीकासाठी ३ कोटी लिटर पाणी लागेल. तर पाणी वाचवा. प्रकल्पास शुभेच्छा. पर्यावरण सल्लागाराचे अभिनंदन करण्यात येते की त्यांनी पर्यावरणाच्या सद्यस्थितीचा अहवाल दिला. श्री रेड्डी यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयास सदरहू प्रकल्पास त्वरित मंजूरी करण्याची शिफारस करण्याची विनंती केली. त्यांनी त्यांचे निवेदन लेखी स्वरुपात उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, जालना यांना आगाऊ सादर केलेले आहे.

२३) **श्री शिवाजी चौधरी, राहणार-पैठण, तालुका-केज,जिल्हा-बीड**

येडेश्वरी साखर कारखान्याची निर्मिती २०१३ झाली. २०१७ ला अशीच जाहिर जनसुनावणी घेण्यात आलेली होती, त्यावेळी आम्ही बरेच प्रश्न विचारले होते. कारखाना प्रशासनाने आम्ही उपस्थित केलेल्या सूचनांचे समाधान केलेले आहे. कारखान्याच्या खालच्या बाजूस ३.० कि.मी. अंतरावर आमचे गांव आहे. या कारखान्यातील टाकाऊ पदार्थांमुळे दुष्परिणाम होतात, मात्र कारखान्याच्या नियोजनामुळे कुठलेही दुष्परिणाम दिसत नाही. आसवणी विस्तारिकरण प्रकल्पामुळे स्थानिक सुशिक्षतांना रोजगार मिळणार आहे. माळरानावर राहणा-या शेतक-याची आर्थिक परिस्थिती चांगली राहणार आहे. तरी विनंती करण्यात येते की या प्रकल्पास लवकरात लवकर मान्यता देण्यात यावी.

२४) **श्री रामचंद्र विठ्ठल गुंड, नगरसेवक, केज, जिल्हा-बीड:-**

या प्रकल्पामुळे सर्वांचाच फायदा होणार आहे. आम्ही येथे हॉटेल टाकले आहे. आमचाही फायदा होईल. या प्रकल्पास लवकरात लवकर मान्यता द्यावी, जेणेकरुन आमच्या कष्टाचे पैशात रुपांतर होईल. या प्रकल्पाचा सर्वांनाच फायदा होईल.

**पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीच्या परवानगीने प्रश्नांची उत्तरे दिली:-**

अ) प्रकल्पाचा स्थानिक फायद्याबाबत प्रश्न विचारण्यात आला. तर विस्तारित प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगाराची संधि, स्थानिक व्यवसायात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष वाढ होईल.

आ) प्रकल्पातील उत्पादनापासून उत्पन्न होणारे उप-पदार्थ अगोदरच सांगितलेले आहेत. कार्बन-डाय-ऑक्झाईड, इथेनॉल असे उप-पदार्थ मिळतील,

क) सदरहू आसवणी प्रकल्प हा ३३० दिवस म्हणजे वर्षभर चालू ठेवता येणार आहे,

ड) प्रकल्पात प्रत्यक्ष ४०-५० लोकांना रोजगार मिळेल. तर अप्रत्यक्ष रोजगार व स्थानिक व्यवसायात प्रचंड वाढ होईल. येथे हॉटेल व्यवसाय, मोबाईल दुकाने इ. व्यवसायात वाढ होईल.

इ) स्पेंट वॉशची विल्हेवाट इन्सिनरेशन करणार आहोत. असे प्रश्न विचारण्यात आले. इतर व्यक्तींची मनोगते होती.

डॉ. योगिनी बाळंखे यांनी उपस्थितांना त्यांच्या काही टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. त्यावेळी त्यांनी श्री म्हस्के यांची जी शंका होती त्यास उत्तर देण्याची सूचना केली.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की कार्यरत व विस्तारित प्रकल्प या एकत्र म्हणजे १०५.० केएलपीडी आसवणी क्षमतेचा स्पेंट वॉशचे उत्पादन होईल. त्याची विल्हेवाट बायो-मिथिनायझेशन प्लँटमध्ये घालून त्याचा डायजेस्टरमध्ये एकत्रित (Concentrated) करुन जाळला जाईल. त्यातील पाणी काढून त्या पाण्याचा प्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येईल.

डॉ. पी.एम.जोशी, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी काही सुचना केल्या त्या खालीलप्रामाणे आहेत :-

आज जी जनसुनावणी झाली, त्यात प्रकल्प अधिकारी व पर्यावरण सल्लागार यांनी चांगली उत्तरे दिली. त्याचप्रमाणे उपस्थितांपैकी एकाने मागच्या जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचनांचे प्रकल्प प्रवर्तकांनी पालन केल्याचेही सांगितले. त्यांनी मत व्यक्त केले की, जे चांगले चाललेले आहे, तसेच चांगलं राहो. म.प्र.नि.मंडळाने पारित केलेल्या संमतीपत्रातील (Consent) अटी व शर्तींचे पालन व्हावे. त्याचप्रमाणे ऑनलाईन मॉनिटरिंग जलप्रदूषणासाठी व ऑनलाईन मॉनिटरिंग स्टॅकसाठी त्वरित प्रकल्पात कार्यान्वित करण्यात यावेत. ते म.प्र.नि.मंडळ व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्व्हरला जोडण्यात यावेत. हे पर्यावरण संवर्धन व प्रकल्प कार्यक्षमतेने चालण्यासाठीच आहे. त्याचप्रमाणे पर्यावरण अनुमतीतील सर्व अटी व शर्ती पाळाव्यात, प्रकल्पातील सर्व सयंत्रणांची वेळोवेळी काळजी व देखभाल (Operation & Maintenance) घ्यावी.

डॉ. योगिनी बाळंखे यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीचे अध्याक्षा श्री. राजेंद्रा जगताप साहेब यांना दोन शब्द बोलण्याची विनंती केली.

अध्यक्षांनी कारखान्याच्या सर्व संचालक मंडळाचे अभिनंदन केले. ग्रामीण भागात मैलोनमैल काही नसताना त्यांनी हा कारखाना येथे उभारला. मात्र ही जनसुनावणी आहेत. लोकांच्या शंका त्यांनी मांडल्या आहेत. त्याची नोंद घेण्यात आलेली आहे. लोकांनी उपस्थित केलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे. आमचाही (पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती) निर्णय तोच राहिल. लोकांची जागरुकता आता वाढत चाललेली आहे. पूर्वी ज़नसुनावणीत उपस्थिती अगदी नगण्य असे. आता पारदर्शकता वाढत चाललेली आहे. ती

पारदर्शकता ठेवून लोकांना विश्वासात घेऊनच आपण वाटचाल केली पाहिजे. त्यांनी संचालक मंडळाचे जनसुनवाणी योग्य प्रकारे आयोजित केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

डॉ. योगिनी बाळंखे यांनी अध्यक्ष व सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्यांची बैठकीच्या इतिवृतान्तात नोंद घेण्यात येईल. इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करुन मा. अध्यक्षांच्या मंजूरीने अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व प्राप्त लेखी सूचना यांसोबत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समितीत याबाबत योग्य तो निर्णय घेईल. त्यांनी सर्व स्थानिक जनता, कारखाना प्रशासन, पत्रकार, पर्यावरणप्रेमी यांचे आभार मानले आणि अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या वतीने जनसुनावणी बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी बैठक संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेल्या दिं. ०७/०२/२०२१, दिं. ०८/०२/२०२१ तसेच दिं. ११/०२/२०२१ रोजीच्या सूचना /आक्षेप सोबत जोडत आहोत.

**(डॉ. प्रविण जोशी)**
सदस्य
तथा
प्रादेशिक अधिकारी
म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद

**( रविंद्र जगताप )**
अध्यक्ष
तथा
जिल्हाधिकारी, बीड
रविंद्र जगताप
जिल्हाधिकारी, बीड

**(डॉ. योगिनी बाळंखे)**
समन्वयक
तथा
उप प्रादेशिक अधिकारी
म.प्र.नि.मंडळ, जालना